क.१७६/आस्था-३/आंजिब/धोरण/२०१५
पोलीस अधीक्षक रायगड यांचे कार्यालय
अलिबाग, दिनांक. १५/११/२०१५.
१२

**विषय** :- पोलीस शिपाई ते स.पो.उ.नि. दर्जा पर्यंतच्या पोलीस कर्मचा=यांच्या आंतरजिल्हा बदल्याबाबत.

**परिपत्रक :-**

पोलीस शिपाई ते स.पो.उ.नि. दर्जा पर्यंतच्या पोलीस कर्मचा=यांच्या आंतरजिल्हा बदल्याचे अधिकारी हे घटक प्रमुखांना देण्यात आलेले आहेत. पती-पत्नी एकत्रिकरण, स्वतःचे औषधोपचार, आई-वडीलांची देखभाल, मुलांचे शिक्षण, मुळ जिल्हयात राहणे आवश्यक, इत्यादी वेगवेगळया कारणास्तव आंतरजिल्हा बदलीसाठी अर्ज सादर केले जातात. त्यामध्ये एकसुत्रता आणि पारदर्शकता आणणेसाठी व समग्र धोरण राबविणे आवश्यक आहे. ज्यामुळे कोणत्याही कर्मचा-यावर अन्याय होणार नाही.

वारंवार आंतरजिल्हा बदलीवर जास्त कर्मचारी सोडल्यामुळे पुढील पोलीस भरती होईपर्यंत सदची पदे रिक्त राहतात. पोलीस भरती होवुन मुलभुत प्रशिक्षण होई पर्यंत तीन ते चार वर्ष लागतात. त्यामुळे प्रशासकीय अडचण निर्माण होण्याची शक्यता असते. सागरी सुरक्षा/वाढते शहरीकरण/पर्यटन विकास/कायदा व सुव्यवस्था विचारात घेऊन प्रशासकीय सोईने किती कर्मचारी सोडले जावु शकतात याबाबत आढावा घेण्यात येऊन त्यानंतर तेथे कर्मचारी आंतरजिल्हाबदलीवर सोडण्यात येतील.

त्यानुसार आंतरजिल्हा बदली संदर्भात खालील प्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) दरवेळी पोलीस भरतीच्या अगोदर प्रशासकीय सोईने किती कर्मचारी आंतरजिल्हा बदलीवर सोडले जाऊ शकतात याबाबतचा आढावा घेण्यात येईल. व तेवढे कर्मचारी आंतरजिल्हा बदलीवर सोडण्यात येतील.

२) वरील बाबत खालील प्रकरणांत प्राधान्याने निर्णय घेण्यात येईल.

**अ) पती-पत्नी एकत्रिकरण**

जर पती किंवा पत्नी शासकीय / निमशासकीय कार्यालयाच्या सेवेत असतील तर त्यांनी विनंती केलेल्या जिल्हयात आंतरजिल्हा बदली बाबत प्राधान्याने विचार करण्यात येईल. परंतु सन २०११ व त्यानंतरच्या नियमांत आंतरजिल्हा बदली अनुज्ञेय नसल्याने सन २०११ नंतर भरती झालेल्या कर्मचा=यांना आंतरजिल्हा बदली अनुज्ञेय राहणार नाही.

**ब) अपंग**

जर एखादा कर्मचारी सेवा बजावीत असतांना अपघात झाल्यास व त्या अपघातात गंभीर रित्या जखमी होवुन त्यास ५० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व आल्यास आणि त्याला यासाठी नेहमी मोठे शहरात सतत उपचाराची आवश्यकता असल्यास त्यांच्या अर्जाचा प्राधान्याने आंतरजिल्हा बदलीसाठी विचार करण्यात येईल.

**क) मतीमंद/गतीमंद**

एखादा कर्मचारी या जिल्हयात नोकरी करीत असेल व या जिल्हयात मतीमंद/गतीमंद मुलांची शाळा नसेल, परंतु त्यांचा पाल्य मतीमंद/गतीमंद असल्यास मतीमंद/गतीमंद पाल्याच्या औषधोपचारासाठी, शिक्षणासाठी विशिष्ठ जिल्हयात बदली मिळण्याची विनंती केल्यास त्यांचा पाल्य मतीमंद/गतीमंद असल्याचे नियमाप्रमाणे आवश्यक सक्षम वैदयकीय अधिका=याचे प्रमाणपत्र सादर केल्यावर आंतरजिल्हाबदलीसाठी प्राधान्य देण्यात येईल.

ड) पती-पत्नी दोघे एकाच जिल्हयात पोलीस दलात कार्यरत असतांना दोघांपैकी जर एक सेवेत असतांना मयत झाल्यास पती/पत्नी यांना ते ज्या जिल्हयाचे मुळ रहिवासी असतील त्या पती किंवा पत्नीचे मुळ जिल्हयात आंतरजिल्हा बदली देण्यात येईल.

३) कर्मचारी यांचे एका ठराविक दिवसापर्यंत या कार्यालयात प्राप्त झालेल्या सर्व अर्जांचा आढावा घेऊन सेवाजेष्ठतेप्रमाणे ते अर्ज लावुन त्यानुसार सेवाजेष्ठतेप्रमाणे कर्मचा=यांना आंतरजिल्हा बदलीसाठी प्राधान्य दिले जाईल.

४) पती किंवा पत्नी खाजगी संस्था/कार्यालयाच्या सेवेत असतील अश पोलीस कर्मचा=यांच्या बाबतीत पती/पत्नी एकत्रीकरणाचे निकष लावता येणार नाहीत.

५) पती/पत्नी एकत्रीकरण अंतर्गत दुस-या घटकांत बदलीची मागणी करीत असल्यास पती/पत्नी ज्या जिल्हयात नोकरी करीत असतील त्याच जिल्हयात आंतरजिल्हा बदली करण्यात येईल. अन्य दुस=या ठिकाणी बदली होणार नाही. परंतु नवी मुंबई/बृन्हमुंबई/ठाणे शहर/ठाणे ग्रामीण याठिकाणी कोणत्याही एका घटकात कार्यरत असलेल्या कर्मचा=याला एकत्रिकरणासाठी या ०४ पैकी कोणताही एक घटक देता येईल.

६) आंतरजिल्हा बदलीसाठी कोणत्याही कर्मचा-याची कमीत कमी ५ वर्षे सेवा पुर्ण आवश्यक आहे. त्यानंतरच त्या पोलीस कर्मचाऱ्याचा आंतरजिल्हा बदलीसाठी विचार करण्यांत येईल.

७) आंतरजिल्हा बदलीसाठी सेवाजेष्ठतेचा निकष म्हणुन कौटुबिक प्रश्न/मुलांचे शिक्षण/आई वडीलांचे आजारपण इत्यादी विशेष निकष लावता येणार नाही.

८) राज्य राखीव पोलीस बलातुन बदलीवर आल्यावर त्यांची आंतरजिल्हा बदलीसाठी सेवा जेष्ठता ही भरती दिनांकानुसार गणली जाईल. त्याप्रमाणे त्यांची सेवाजेष्ठता लावण्यात येईल. परंतु त्यांना या जिल्हयात किमान ०५ वर्षे सेवा करणे आवश्यक राहील.

९) कर्मचा-यांची आंतरजिल्हा विनंती मान्य झाल्यावर कर्मचा-यांनी विनंती केलेल्या जिल्हयात जर सदरचे पद रिक्त नसेल तर त्यांना इच्छेप्रमाणे इतर जिल्हयात आंतरजिल्हा बदली मिळणेबाबतचा हक्क अबाधीत राहील.

वरील नमुद अटींची जे पोलीस कर्मचारी पुर्तता करीत असतील, अशाच पोलीस कर्मचाऱ्यांनी आंतरजिल्हा बदलीसाठी या कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत. अन्यथा आंतरजिल्हा बदली अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(मो.सुवेज हक)
पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग

<u>प्रति :-</u>

राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय अलिबाग.
सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी.
सर्व स्थानिक शाखा प्रभारी अधिकारी.

<u>प्रत :-</u>

अपर पोलीस अधीक्षक, रायगड.
पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय).
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी.
जिल्हा पोलीस राजपत्र.

<u>प्रत माहितीस्तव सादर,</u>

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, कोंकण भवन, नवीमुंबई.